# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक ०८.०५.२०२६ शुक्रवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे शांतीनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०५.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक ०७.०५.२०२६ चे १३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, प्लॉट नं. ४३, लालगंज, पहाडपुरा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी लक्ष्मण मारोती निमजे, वय ४५ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह कळमना येथे नातेवाईकाकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी तिन आलमारी व लोखंडी पेटीतील रोख ३६,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,८६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. राम बारोळे ९८८१९८९००४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— गोवंशीय जनावरांची चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०५.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक ०७.०५.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी मोरेश्वर कवडूजी सयाम, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. ३२, जुनी वस्ती, तरोडी खुर्द, नागपुर यांनी त्यांचे १६ गोवंशीय जनावरे यांना पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्रधान मंत्री आवास योजना जवळील हनुमान मंदीर मागे, दिलीप आदमने यांचे जागेवर असलेल्या गोठ्यात बांधून ठेवले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे नमुद गोवंशीय जनावरांपैकी लाल रंगाच्या ०४ गायी व पांढऱ्या रंगाचे ०२ वासरू असे एकुण ०६ जिवंत गोवंशीय जनावरे एकुण किंमती १,२४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. कृष्णा साळुंके ८९७५१४८८०१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. नेहा नितीन ठाकरे, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ७६, चंदन शेषनगर, हुडकेश्वर, नागपूर ह्या दिनांक ०५.०५.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ३ इंच, केस— काळे लांब, अंगात— पांढऱ्या रंगाची टी—शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** कु. पुर्वा प्रकाश गायकवाड, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. १६, शिर्डी नगर, संजुबा शाळेजवळ, उमरेड रोड, हुडकेश्वर, नागपूर ही पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील प्लॉट नं. २०६, कमलक्रिष्णा नगर टाऊन, कलावती नगर पिपळा फाटा, नागपुर येथे राहणारे नातेवाईकाचे घरी गेली होती. तेथुन ती दिनांक ०५.०५.२०२६ चे ०१.४५ वा. चे सुमारास कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— निळ्या रंगाची टी—शर्ट व काळ्या रंगाची लॅगीन घातलेले असून, सोबत काळ्या रंगाची स्कुलबॅग आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे यशोधरानगर :—** कश्यप वामनराव कोसारे, वय ६६ वर्षे, रा. प्लॉट नं. ६७७, पवन नगर, यशोधरानगर, नागपूर हे दिनांक २९.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरून, दिल्ली येथे झेरॉक्स मशीन घेण्याकरीता गेले होते. आजपावेतो घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे—पांढरे, मिशी— पांढरी, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


नेहा


पुर्वा


कश्यप

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी | ३२१/२०१७ | कलम ८२ सी.आर.पी.सी. प्रमाणे | उपेन्द्र पाल, रा. १९ गार्ड आर्मी नं. १५६१५७३८ वाय जी आर मिलीट्री फिरोजपुर महाराष्ट्र | २५.०५.२०२६ |
| २. | मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी | ९००१७३/२०१४ | कलम ८२ सी.आर.पी.सी. प्रमाणे | मोहम्मद सुलतान मोहम्मद उशमान कुरैशी, रा. एसआय कॅन्टीन जवळ, मोमीनपूरा, नागपूर | २५.०५.२०२६ |
| ३. | मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी | ९००२४३/२०१३ | कलम ८२ सी.आर.पी.सी. प्रमाणे | हेमलाल कोसारीया, रा. आर बी १३८५, ब्लॉक ओ, अजनी रेल्वे क्वॉर्टर, अजनी, नागपूर. | २५.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कामठी | ८७०/२० १६ | कलम ८२ सी.आर.पी. सी. प्रमाणे | शाहरूख अली शेख अली, रा. गरोबा मैदान, नागपूर. | २५.०५.२०२६ |
| ५. | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपूर | ३२४०१७ ३/२००३ | कलम २९४, ५०६(ब) भा. दं.वि. | चंद्रशेखर किशोर तिवारी, वय २० वर्षे, रा. टेंपल बाजार गल्ली, सिताबर्डी, नागपूर. | ११.०५.२०२६ |
| ६. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०१ नागपूर | ३२४०१७ ३/२००३ | कलम २९४, ५०६(ब) भा. दं.वि. | चंद्रशेखर किशोर तिवारी, वय २० वर्षे, रा. टेंपल बाजार गल्ली, सिताबर्डी, नागपूर. | ११.०५.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०१ नागपूर | ३२४०४३ ४/२००३ | कलम ३७९ भा.दं.वि. | अनुप शिवदत्त भट, रा. नटराज टॉकीज मागे, सर्कल नं. ६ , कोतवाली, नागपूर. | ११.०५.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**